-: प्रेसनोट दिनांक - १५/०६/२०२१ :-

**इतर आरोपी लोकसेवक लोकसेवक विशाल विलास भोसले,वय ४९, मंडळ अधिकारी, कसबा वाळवे, ता. राधानगरी, जिल्हा कोल्हापुर, रा.जूनी मोरे कॉलनी, विजय खोत यांचे घरी, संभाजीनगर, कोल्हापूर यांनी लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

तक्रारदार रमेश आनंदा सावंत, रा. तुरंबे, ता. राधानगरी यांचा प्लॉट देणे घेणेचा व्यवसाय आहे. त्यांनी विक्री केलेल्या प्लॉट चे ७/१२ पत्रकी नांव नोंदणीकरिता डायरी मंजूर होणेसाठी दिनांक १२/०६/२०२१ रोजी मंडळ अधिकारी विशाल भोसले यांची भेट घेतली असता मंडळ अधिकारी डायरी मंजूर होणेसाठी तुम्ही ३,०००/-रुपये दिले पाहिजे मगच डायरी मंजूर करतो असे सांगितले म्हणून विशाल भोसले मंडळ अधिकारी यांचेविरुध्द दिनांक १४/०६/२०२१ रोजी तक्रारी अर्ज दिला.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक १५/०६/२०२१ रोजी शासकीय पंच साक्षीदार यांचे समक्ष शेळेवाडी, ता. राधानगरी गावातील तलाठी कार्यालयात लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी मध्ये सर्कल विशाल भोसले यांनी तक्रारदार यांचेकडे ७/१२ पत्रकी नांव नोंदणीसाठी डायरी मंजूर होणेसाठी ३,०००/- रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती रुपये २०००/- लाच रक्कम ग्रामपंचायत कार्यालय शेळेवाडी, ता. राधानगरी येथे देण्याचे सांगितलेचे निष्पन्न झाले

त्याप्रमाणे सदर ठिकाणी सापळा कारवाई आयोजित केली असता, शेळेवाडी ग्रमपचांयत कार्यालयात तक्रारदार यांनी विशाल विलास भोसले, सर्कल ऑफिसर, कसबा वाळवे, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर तक्रारदार यांची समक्ष भेट घेवून तक्रारदार यांच्याकडे पंच साक्षीदार यांच्या समक्ष ७/१२ पत्रकी नांव नोंदणीसाठी डायरी मंजूर होणेसाठी रुपये २,०००/- लाचेची रक्कम मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत असून त्यांच्याविरुध्द राधानगरी पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. सुहास नाडगोंडा, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक व युवराज सरनोबत, पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनानुसार, श्री. सतिश मोरे, पोलीस निरीक्षक, पोलीस हवलदार अजय चव्हाण, पोलीस हवलदार शरद पोरे, पोलीस नाईक सुनिल घोसाळकर व पोकॉ.रुपेश माने, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे**
**दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३**
**३) श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,कोल्हापूर मो.नं.- ९०११२२८३३३**
**दुरध्वनी कमांक :- ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४.**
**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३**

Scanned by TapScanner